D:\नोटीसबाबत\समिती सदस्य निर्हताबाबत.docx

१६५

जा.क्र. सनिक/अ/नापणे विकास/कलम ७३कअ(अ१)/ /सन २०१८
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कणकवली (कॅम्प-वैभववाडी)
यांच कार्यालय, वैभववाडी, भोगले बिल्डींग, वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक :- ९ /०३/२०१८

वाचले :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७३कअ(अ१)
२) श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे, मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग यांचेकडील अर्ज दि. /०२/२०१८
३) या कार्यालयाकडील नोटीस जा.क्र. सनिक/अ/नापणे विकास/कलम ७३कअ/६५/सन २०१८, दि. १७/०२/२०१८
४) श्री. विनोद मोतिराम जठार, व्यवस्थापक समिती सदस्य, श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे, मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग यांनी समक्ष केलेला तोंडी खुलासा. दि. २६/०३/२०१८

## आदेश

उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे, मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग या संस्थेने केलेल्या अर्जास अनुसरुन वाचले क्र. ३ चे नोटीशीने आपणास आपले म्हणणे मांडणेबाबत दि. २६/०३/२०१८ रोजी समक्ष उपस्थित राहून तोंडी अगर लेखी स्वरुपात म्हणणे मांडावे अगर खुलासा करणेबाबत सुचित करणेत आलेले होते. वाचले क्र. ४ अन्वये . विनोद मोतिराम जठार, व्यवस्थापक समिती सदस्य, श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे, मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग यांनी समक्ष केलेला खुलासा समाधानकारक नाही.

त्याअर्थी, श्री. विनोद मोतिराम जठार, व्यवस्थापक समिती सदस्य, श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे, मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कअ(अ१)(१)(एक)(ख) अन्वये कसुरदार व्यवस्थापक समिती सदस्य ठरत आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कअ(अ१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी एस. एच. कांबळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कणकवली (कॅम्प-वैभववाडी) श्री. विनोद मोतिराम जठार, व्यवस्थापक समिती सदस्य, श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे, मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग यांचे व्यवस्थापक समिती सदस्य पद या आदेशाद्वारे निरसित करणेत येत आहे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कणकवली ता. कणकवली, जि सिंधुदुर्ग

(एस. एच. कांबळे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कणकवली
(कॅम्प-वैभववाडी)

प्रति,
श्री. विनोद मोतिराम जठार,
संचालक, श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे,
मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग

प्रत –
चेअरमन/सचिव,
श्री देव ठाणेश्वर वि. का. स. सेवा. संस्था लि, नापणे,
मु.पो. नापणे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग